• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक ३१७ • रविवार,दि.१८ फेब्रुवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 317 • Sunday 18 Feb 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज | बीड | परभणी | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955



## बीडची सार्वजनिक शिवजयंती उत्साहात साजरी होणार

**बीड । प्रतिनिधी**

दरवर्षी प्रमाणे सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहरकडून यावर्षीचीही शिवजयंती मोठ्या उत्साहाने साजरी केली जाणार आहे. शासकीय महापूजा आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम असे जयंती उत्सवाचे स्वरूप असून जयंती साजरी करण्यासाठी सर्व बीडकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर व जयंती उत्सव समितीकडून करण्यात आले आहे.



संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या वैशिष्ट्यपूर्णतेने चर्चेत राहणारी बीड शहराची सार्वजनिक शिवजयंती यावेळेसही मोठ्या उत्साहात साजरी केली जाणार आहे. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वा. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील महाराजांच्या पुतळा परिसरात महापूजा व अभिवादन करण्यात येईल. त्यानंतर सायंकाळी ५:३० वाजता बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमांना सर्व बीडकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आ.संदीप क्षीरसागर व जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष दत्ता साळुंके, उपाध्यक्ष सिद्दीक फारूखी यांच्यासह समितीकडून करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील विविध ठिकाणचे प्रसिद्ध ढोल पथक, दिल्ली येथील पुढील पानावर

# मराठा समाजाला १० टक्के आरक्षणाचा कायदा होणार?

**मुंबई । वृत्तसेवा**

**मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या अध्यक्षतेखालील राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सादर करण्यात आला. आयोगाने मराठा समाजाच्या मागासलेपणावर शिक्कामोर्तब केले. त्यावर येत्या मंगळवारी विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात चर्चा करून मराठा समाजास १० टक्के आरक्षण देण्याबाबतचा कायदा करण्यात येणार असल्याचे समजते. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाचे गेल्या वर्षभरापासून आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाची दखल घेत मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध करून त्यांना पुन्हा आरक्षण देण्यची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली होती. त्यानुसार मराठा समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाचे गठन करण्यात आले होते.**

राज्य मागासवर्ग आयोगामार्फत गोखले इन्स्टिटयूट, आयआयपीएस या नामांकित संस्थांच्या साह्याने २३ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान मराठा व खुल्या प्रवर्गाचे सर्वेक्षण करण्यात आले. त्यानुसार आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी मराठा समाजाचे मागासलेपण तपासण्यासाठी राज्यभरात घेण्यात आलेल्या सर्वेक्षणाचा अहवाल तयार करण्यात आला.

आयोगाने मराठा समाजाच्या मागासलेपणावर शिक्कामोर्तब केले असून त्यानुसार मराठा समाजास शिक्षणात आरक्षण देण्याबाबतचे विधेयक विधिमंडळात संमत करण्यात येणार आहे. तसेच मराठा समाजाच्या अन्य प्रश्नावर तसेच कुणबी नोंदी साडपडेल्यांना कुणबी दाखले देण्याबाबतची या अधिवेनात चर्चा होणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

मराठा समाज हा सामाजिकदृष्ट्या मागासलेला असल्याने घटनेच्या १५ (४) आणि १६ (४) या अनुच्छेदानुसार आरक्षणास पात्र ठरतो, असा अहवाल राज्य मागासवर्ग आयोगाने दिला आहे. मराठा समाजाला आरक्षण लागू केल्यावर ५० टक्क्यांची आरक्षणाची मर्यादा ओलांडली होईल. मराठा समाजाला अपवादात्मक परिस्थितीत आरक्षण देण्याची शिफारस राज्य मागासवर्ग आयोगाने केली आहे, असे समजते.

– मराठा समाजाला उच्च न्यायालयाने नोकऱ्यांत १२ टक्के, तर शिक्षणात १३ टक्के आरक्षण लागू केले होते. या धर्तीवरच १२ आणि १३ टक्के आरक्षण द्यावे, असा प्रस्ताव आहे.

– कायद्याच्या कसोटीवर आरक्षण टिकावे या उद्देशाने १० टक्क्यांच्या आसपास आरक्षण द्यावे, असा सरकारचा प्रस्ताव आहे.

– मंत्रिमंडळाने अहवाल स्वीकारल्यावर किती टक्के आरक्षण द्यायचे, याचा निर्णय घेतला जाईल.

– १० ते १२ टक्के या प्रमाणात आरक्षणाचा कायदा करण्यात येणार असल्याचे उच्चपदस्थ सूत्रांनी सूचित केले.




## मराठा समाजाकडून आरक्षणासाठी आंदोलने

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसेवा**

मनोज जरांगे पाटील यांच्या आमरण उपोषणाकडे शासन दुर्लक्ष करीत असल्याने संतप्त झालेल्या सकल मराठा समाजाने राज्यभरात ठिकठिकाणी आंदोलन सुरु केले आहे. मराठा समाजाकडून काल राज्यभरात चक्काजाम आंदोलन करण्यात आले. अनेक ठिकाणी महामार्ग ब्लॉक करण्यात आले होते. आजदेखील मराठा बांधव आक्रमक झाले असून ठिकठिकाणी आंदोलन करत आहेत. राज्यभरातील सध्याची परिस्थिती काय जाणून घ्या. सातारा पुणे या मार्गावरून येणाऱ्या मार्गावर वाखरी चौकात रास्ता रोको आंदोलन सुरु केल्याने सातारा व पुणे मार्गावरून येणारी शेकडो वाहने अडकून पडली आहेत. गोपाळपूर चौकात केलेल्या चक्का जाममुळे मंगळवेढा आणि कर्नाटकमधून येणारी सर्व वाहतूक ठप्प झाली आहे. याशिवाय कासेगाव येथे सुरु असलेल्या चक्का जाममुळे कोल्हापूर आणि कोकणातून येणारी वाहतूक थांबली आहे. या रास्ता रोकोमुळे पंढरपूरातून देखील वाहने बाहेर पडू शकत नसल्याने सर्वच मार्गांवर शेकडो एसटी बसेस अडकून पडल्या आहेत. सर्वच ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त असून सर्व ठिकाणी शांततेत आंदोलन केले जात आहे.




परभणीत दुसऱ्या दिवशीही मराठा समाज बांधव आक्रमक झाले आहेत. परभणीच्या सेलू–परतूर महामार्गावरील हदगाव खुर्द येथे रस्त्यावर टायर जाळून आणि जागोजागी काटेरी झुडपे, दगडे आडवे लावून रस्ता रोको आंदोलन करण्यात आले आहे. या मार्गावरची वाहतूक मराठा समाज बांधवांनी बंद केली आहे. त्यामुळे नागरिकांना प्रचंड गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. दोन्ही बाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. हिंगोली जिल्ह्यातील गिरगाव पाटीवर कालपासून रास्तारोको आंदोलन सुरू आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहे. प्रशासनाच्या वतीने हे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला जातोय, असा आरोप आंदोलकांनी केला आहे. जोपर्यंत आरक्षणाची अंमलबजावणी होत नाही, तो पर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा पवित्रा आंदोलकांनी घेतला आहे. मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी वसमत आणि हिंगोली या तीनही आगारातील बस सेवा बंद आहे. त्यामुळे ५०० हून अधिक बस फेऱ्या रद्द करण्यात आल्या आहेत. बीड जिल्ह्यातील परळीत बीड व गंगाखेड रस्त्याला जोडणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज चौक–इटके कॉर्नर येथे सकाळी १० पासून मराठा समाजाने रास्ता रोको करत चक्काजाम आंदोलन केले. या चक्काजाम आंदोलनासाठी रस्त्यात गाड्या लावून आंदोलकांनी वाहतूक थांबवत राज्य शासनाचा निषेध करण्यात आला. नाशिक–मुंबई महामार्गावर आडगावजवळ सकल मराठा समाजाच्यावतीने पुढील पानावर

## मराठा आरक्षणप्रश्नी माजलगावात धरणे आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा आरक्षणासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन होत आहेत.याच आंदोलनास पाठिंबा म्हणून माजलगाव येथे दि.१७ फेब्रुवारी शनिवार रोजी सकल मराठा समाजाच्यावतीने एक दिवसीय धरणे आंदोलन पुकारले होते. त्यानुसार दि १७ फेब्रुवारी शनिवार रोजी माजलगाव शहरातील बाजार समिती कार्यालय समोरील प्रांगणात या धरणे आंदोलन सकाळी ११:०० वाजता सुरू करण्यात आले.या धरणे आंदोलनात माजी आ. राधाकृष्ण होके पाटील,बाबुराव पोटभरे, माझी नगराध्यक्ष सहाल चाऊस, बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, भाजपाचे तालुकाध्यक्ष अरुण राऊत,शरद पवार गटाचे मनोहर डाके, बबनराव सोळंके, शेख मंजूर,नासेर खा पठाण,नारायण होके,ऍड.बी.आर. डक, नितीनराव नाईकनवरे, डॉ.अशोक तिडके, कचरूजी खळगे, अच्युतराव लाटे, ईश्वर खुर्पे,राम गायकवाड,दत्ता महाजन,अभय होके पाटील,सचिन डोंगरे,अमित नाटकर,मुज्जमिल पटेल,राहुल जगताप,अविनाश गोंडे, भालचंद्र सोंळके,शहाजी सोळंके, पुढील पानावर

## शेतकऱ्यांनी राज्य सरकारला गाडावं –ठाकरे

**मुंबई । वृत्तसेवा**


पाकिस्तान आणि चीनच्या सीमेवर सैनिक पाहिजे ते दिल्लीत आहेत, त्यांचे आई वडील शेतकरी आहेत. त्यांना रोखतात, मोठी भिंत लावतात. खिळे टाकतात. ज्या मातीत सोनं उगवतात त्याच मातीत शेतकऱ्यांनी सरकारला गाडावे, अशी घणाघाती टीका शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केली आहे. श्रीरामपूर येथे ठाकरे गटाच्या संवाद मेळाव्यात ते बोलत होते. उद्धव ठाकरे म्हणाले की, गेल्या आठवड्यापासून मी कुटूंब संवाद करत आहेत. मी माझ्या कुटूंबाला भेटण्यासाठी आलो. मुख्यमंत्री असताना फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून संवाद साधत होतो. आता त्या कुटुंबाशी भेटायला आलो. आता कोरोना नाही पण नवीन व्हायरस आहे. हुकूमशाहीचा, हात धुवा आणि हा व्हायरसचा घालवा, असे ते म्हणाले. आज एक भ्रष्टाचारी भाजपमध्ये आला हा भाजपलाच धक्का आहे. काँग्रेस आणि महाविकास आघाडीला नाही. शिवसेनेला धक्का नाही बसला, असे धक्के आम्ही अनेक पचवले आहेत. सडलेले पान झडली गेली आणि नवी कोंब फुटतात. भ्रष्टाचाराचे आरोप करायचे आणि खासदारकी, उपमुख्यमंत्री, मुख्यमंत्रीपद द्यायचे हीच मोदी गॅरंटी आहे का? असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला.



अवकाळीचा फटका बसला. दुष्काळात अशोक चव्हाणांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्याऐवजी ते मोदींच्या दारात गेले. मोदी १० वर्षांपासून स्वप्न बघत आहेत. मोदी ३ तास झोपतात. त्यांना स्वप्न पडतात कधी? तुमचे स्वप्न पूर्ण करण्याची भाजपची ताकद नाही का? नालायक लोक आहेत. तुमच्या पक्षात म्हणून दुसरे पक्ष फोडावे लागतात का? माझी शिवसेना फोडली, नितीश कुमार, अशोक चव्हाण फोडले. दिल्लीच्या वेशीवर धुमशान चालू पुढील पानावर




## आ.सोळंकेंसोबत निष्ठावंत दगाफटका करणार?



**माजलगाव । प्रतिनिधी**

राज्य पातळीवर सुरु असलेल्या राजकीय पक्षांतराचे परिणाम येणाऱ्या काळात हळूहळू स्थानिक पातळीवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. माजलगाव राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात मोठा स्फ़ोट लवकरच होण्याची शक्यता असून आमदारकीचे वेध लागलेल्या व आमदारकीसाठी अजित पवारांकडे डाळ शिजत नसलेल्या मुंबई मार्केट कमिटीचे माजी सभापती अशोक डक उपमुख्यमंत्री अजित पवारांना ठेंगा दाखवण्याच्या तयारीला लागल्याचे राजकीय वर्तुळत बोलले जात आहे.त्यासाठी आमदार प्रकाश सोळंकेच्या निष्ठावंत लोकांना गळाला लावण्यासाठी मुंबई मार्केट कमिटीचा वापर सद्या करत असल्याचेही चर्चा मागील दोन चार दिवसापासून माजलगाव शहरासह तालुक्यात होत आहे. एप्रिल २०२३ च्या माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक होऊन १० महिने होत आहे. या निवडणुकीतच आ.प्रकाश सोळंके यांचे पुत्र वीरेंद्र सोळंके यांना पराभूत करण्यासाठी अशोक डक यांनी अंधारातून फिल्डिंग लावल्याचे सर्वश्रुत आहे.आ सोळंकेच्या विश्वसूचा मार्केट कमिटीच्या निवडणुकीत काटा काढण्यासाठी त्यांनी विरोधी पॅनलला मदत करुन व्यापारी ग्रामपंचायत व सोसायटी पॅनलमध्ये आ.सोळंकेना जेरीस आणल्याची चर्चा निकाला दिवशी मतमोजणी केंद्रावर होती.मात्र आ.सोळंकेची मजबूत पकड सोसायटी मतदार संघात असल्यामुळे निसटता विजय आ.सोळंके यांना मिळाला.यामुळे तीळपापड झालेल्या अशोक डक यांनी मुबंई मार्केट कमिटीच्या अभ्यास दौरा काढण्याच्या नावाखाली सहा पुढील पानावर



दैनिक मराठवाडा पत्र





संपादकीय

# स्मार्ट सुरुवात

विज्ञान आणि तंत्रज्ञान यात मूलतःफरक आहे. विज्ञानातून तंत्रज्ञान तयार होतं आणि नंतर ते आपल्याला वापरायला मिळतं; पण विज्ञान समजूनच घ्यावं लागतं. विज्ञान हे मेंदूत असतं तर तंत्रज्ञान बोटांच्या टोकावर असतं. ते वापरण्यासाठी मेंदूचा वापर करावा लागतोच असं नाही. किंबहुना अलीकडच्या काळात तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापराबरोबर मेंदूचा वापर कमी-कमी होत असल्याचाच अनुभव आपल्याला आला. स्मार्टफ़ोन नसताना आपण कितीतरी टेलिफ़ोन नंबर लक्षात ठेवत होतो. आज डबल सिमकार्ड वापरणारे अनेकजणांना आपल्या दोनपैकी एकाच सिमचा नंबर तोंडपाठ सांगता येतो. इतरांचे नंबर लक्षात ठेवणं आपण कधीच बंद केलंय. विज्ञान आणि तंत्रज्ञानातला भेद स्पष्ट करण्याची गरज अशासाठी, की अनेकजण तंत्रज्ञानाला केलेला विरोध हा विज्ञानाला केलेला विरोध मानतात. परंतु आपण जर स्वतःशी खरं बोलायचं ठरवलंच, तर तंत्रज्ञानामुळं आपलंही काही नुकसान झालंय, हे स्वीकारावंच लागतं. आपल्या मनाने आपल्याला वास्तव सांगितलं, की मग कुठूनतरी 'अपरिहार्य' हा शब्द येतो. काळाबरोबर राहिलं पाहिजेच आणि त्यासाठी येणारा प्रत्येक बदल आहे तसा स्वीकारलाच पाहिजे, असं कुठेतरी ऐकलेलं तत्त्वज्ञान आपलं मन आपल्याला सांगू लागतं. आपण आवड, गरज हे शब्द विसरून केवळ 'अपरिहार्यता' म्हणून तंत्रज्ञानाशी मैत्री कायम ठेवतो आणि प्रवाहाबरोबर चालू लागतो खरं तर प्रवाहपतीत होतो. दुष्परिणाम दिसत असले तरी दुर्लक्षिले जातात. स्मार्टफ़ोन किंवा त्याच्याशी संलग्न अन्य बाबी चर्चिल्या जात असताना दिसणारं औदासीन्य हे वस्तुतः आपणच आपल्या मनाचं केलेलं दमन असतं. परंतु आपण सर्वच बाबतीत ज्या पाश्चात्यांच्या पावलावर पाऊल टाकून पुढे जात असतो, त्यांचा स्मार्टफ़ोनचा वापर अत्यंत मर्यादित आहे, हे आवर्जून लक्षात घेतलं पाहिजे. लहान वयात स्मार्टफ़ोन हाती पडल्यामुळं (खरं तर दिल्यामुळं) झालेले प्रचंड गुंते आपल्याला भोवताली दिसत असतात. पण एक असं गाव, जे हा गुंता सोडवण्यासाठी पुढे येतं, त्यातल्या लोकांनी मुळात हे मान्य केलेलं असतं, की समस्या आहे. फ़्रान्समधल्या सीन पोर्ट गावात स्मार्टफ़ोनचं व्यसन सोडवण्यासाठी एक पाऊल नुकतंच टाकलंय. मुळात त्यांनी स्मार्टफ़ोन हे 'व्यसन' आहे हे मान्य केल्यामुळं पुढच्या गोष्टी शक्य झाल्या. या गावात स्मार्टफ़ोनच्या सततच्या वापरावर निर्बंध घालण्यासाठी मतदान घेतलं गेलं. निर्बंधांच्या बाजूनं ५४ टक्के लोकांनी मतदान केलं. आता मुद्दा असा, की निर्बंध घातले तरी कारवाईचे अधिकार स्थानिक प्रशासनाला आहेत का? दुर्दैवानं त्याचं उत्तर नकारार्थी आहे. राष्ट्रीय स्तरावर तसा कायदा नसल्यामुळं स्थानिक पातळीवर 'प्रबोधन' हाच उपाय! अर्थात, मुलांसाठी आदर्श स्क्रीन टाइम किती असावा, हे निश्चित करण्यासाठी फ़्रान्समध्ये राष्ट्रीय स्तरावरही तज्ज्ञांची मदत घेतली जातीये. त्याचप्रमाणं १५ वर्षांच्या आतल्या मुलाला फ़ोन देण्यासाठी पालक लेखी करार करतात, तेव्हा अशा मुलांना केवळ कॉलिंगसाठी साधा हँडसेट दिला जातो. तात्पर्य, टोचणी सर्वांनाच आहे आणि सुरुवातही झालीये. जाणीव झालेल्या लोकांची टक्केवारी वाढते की कमी होते, यावर भवितव्य अवलंबून आहे. मुळात हे 'व्यसन' आहे हे मान्य केलं जातंय आणि सोडवण्याचा प्रयत्न होतोय, हेच महत्त्वाचं!

# मराठा समाजाच्यावतीने पुणे-नाशिक महामार्गावर रास्ता रोको



**पुणे । वृत्तसेवा**

मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगे यांच्या समर्थनार्थ खेड तालुक्यातील मराठा समाजाच्या तरुणांनी पुणे- नाशिक महामार्गावर चांडोली (ता. खेड ) येथे (दि. १७) सकाळी रास्ता रोको केला. मनोज जरांगे यांच्या आंदोलनाची दखल घ्यावी व मराठा समाजाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी मराठा मोर्चातील तरुणांनी केली. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी म्हणून जरांगे पाटील लढा देत असून गेल्या काही दिवसांपासून ते अंतरवाली सराटी येथे बेमुदत उपोषणाला बसले आहेत. तरी सरकार मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण करीत नाही याचा निषेध म्हणून खेड तालुका मराठा क्रांती मोर्चा व तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने मराठा युवकांनी मनोज जरांगे यांच्या समर्थनार्थ चांडोली येथील येथे महामार्ग रोखून आंदोलन केले. सुमारे तासभर रास्ता रोखल्यामुळे दोन्ही बाजूने वाहनाच्या रांगा लागल्या होत्या. सुदाम कराळे, मंगेश सावंत, विकास ठाकूर शंकर राक्षे, ड. अनिल राक्षे, मनोहर वाडेकर, हनुमंत कड यांनी मार्गदर्शन केले. बाजार समितीचे सभापती कैलास लिंबोरे, अंकुश काळे, दिलीप होले, निवृत्ती नाईकरे, संदेश पाचारणे, शुभम बालघरे, अनिल नाईकरे, नवनाथ बोरकर, सतीश तनपुरे, बबन होले, अमोल होले, शुभम गाडे, राकेश चव्हाण, जीजाभाऊ मेंदगे, अक्षय भगत आदी या आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी तरुणांनी सरकारविरोधात घोषणा देत सरकारने जरांगे यांच्या आंदोलनाची दखल घेऊन तत्काळ मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत तोडगा काढावा, अशी मागणी केली. पुढील काळात मनोज जरांगे यांना काही झाल्यास त्याला सरकार जबाबदार राहील व त्यानंतर महाराष्ट्रातील रस्त्या-रस्त्यांवर आंदोलने केली जातील,शिवजयंतीच्या दिवशी शिवनेरी किल्ल्यावर मुख्यमंत्र्यांना काळे झेंडे दाखवणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन पाटील, पोलिस निरीक्षक राजकुमार केंद्रे, उपनिरीक्षक सागर खबाले, पोलिस हवालदार संतोष घोलप, सुनील बांडे, अर्जुन गोडसे यांच्यासह पोलिसांनी चोक बंदोबस्त ठेवला होता.

# राष्ट्रवादी दलित आघाडी विभागाच्या निवडी जाहिर

**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी दलित आघाडीच्या (शरद पवार गट) यांच्या तालुकाध्यक्षपदी येथील धडाडीचे कार्यकर्ते सिताराम क्षिरसागर यांची राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष आमदार संदीप क्षीरसागर यांच्या आदेशा वरून तालुका अध्यक्ष मनोहर डाके यांनी नियुक्ती केली आहे. महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) या पक्षाने दलीत आघाडी विभागाच्या कार्यकारणीची निवडी केल्या असून त्यामध्ये तालुकाध्यक्ष पदावर सिताराम क्षीरसागर यांची नियुक्ती केली आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार,कार्याध्यक्ष खा. सुप्रिया सुळे, प्रांतअध्यक्ष जयंत पाटील यांना अभिप्रेत असणारी संघटना बांधणीसाठी आपण प्रयत्नशिल राहून. पक्ष बळकटीसाठी व पक्ष मजबुत करण्यासाठी पक्षाची ध्येय धोरणे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यत पोहचण्यासाठी आपण कटीबध्द रहाल असा विश्वास या पत्रात व्यक्त केला आहे.या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत असून राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते भाई गंगाभिषण थावरे,राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव दयानंद स्वामी,प्रदेश सचिव प्रा.श्रीहरी काळे,प्रदेश सरचिटणीस रमाकांत राठोड, माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष नारायण डक,माजलगाव नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष शेख मंजूर,महाराष्ट्रउपाध्यक्ष ओबीसी विभाग डॉभगवानराव सरवदे, तालुकाध्यक्ष मनोहरराव डाके, जिल्हा सरचिटणीस कचरू तात्या खळगे,जिल्हा उपाध्यक्ष नुमान चाऊस,शहराध्यक्ष शकील भाई कुरेशी, टी. आर. जावळे, विलास जावळे, युबुखान पठाण यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे दिनांक १६ व १७ फेब्रुवारी २०२४ या दोन दिवशी हिंदी विषयाचे राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले. या चर्चासत्राचे उद्घाटन केंद्रीय विश्वविद्यालय हैदराबाद येथील सहयोगी प्राध्यापक डॉ. प्रकाश कोपार्डे यांच्या उपस्थितीत तर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांच्या अध्यक्षतेखाली व स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, हिंदी विभाग प्रमुख डॉ. युवराज मुळये, डॉ. गंगाधर उषमवार यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ रोजी स्वाधीनता आंदोलन और हिंदी कथा साहित्य या विषयावर प्रथम सत्र संपन्न झाले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ. काकासाहेब गंगणे तर विषय प्रवर्तक म्हणून बलभीम महाविद्यालय बीड येथील हिंदी विभागातील डॉ. अमोल पालकर हे उपस्थित होते. याच दिवशी दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ रोजी स्वाधीनता आंदोलन हिंदी फिल्म तथा पत्रकारिता का योगदान या विषयावर दुसरे सत्र संपन्न झाले. या सत्रामध्ये कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय सात्रळ येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ. भाऊसाहेब नवले हे सत्राध्यक्ष तर हिंदी विभाग अहमदनगर महाविद्यालय अहमदनगर येथील डॉ. सातापा चव्हाण हे विषय प्रवर्तक म्हणून उपस्थित होते.

पान १ वरून....

## मराठा समाजाकडून

रास्तारोको आंदोलन सुरु करण्यात आले आहे. नाशिकचे मराठा कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच नाशिक-मुंबई महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र आहे.

## मराठा आरक्षणप्रश्नी

सिद्धार्थ ससाणे,शेख रशीद, दत्ता कांबळे, फारुक सय्यद, अमोल शेरकर, विलास साळवे, शेख मैनिद्दिन, एकनाथ मस्के, लतिफ मोमीन यांच्यासह आंदोलनात सर्व राजकीय पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, मराठा समाजासह सर्व समाज घटकातील नागरिकांनी सहभागी राजकीय पक्षाचे जोडे बाजूला सारून मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आरक्षण आंदोलनास पाठिंबा दिला आहे.

## बीडची सार्वजनिक शिवजयंती

स्टंट ग्रूप, केरळ येथील मार्शल आर्ट संघ, आंतरराष्ट्रीय लेझर-शो, आंतरराष्ट्रीय दर्जाचा लाईट-साऊंड शो अशाप्रकारचे कार्यक्रम यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण असणार आहेत. दरम्यान भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया विश्वचषक सामन्यात जो लेजर शो होता तोच लेजर शो यावेळी शिवजयंतीच्या निमित्ताने बीडकरांना अनुभवायला मिळणार आहे. या लेजर शो च्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रेरणादायी जीवनपट दाखवला जाणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्व महिला भगिनींचा फेटे बांधून सन्मान करण्यात येणार आहे. तसेच यावेळी महिलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था केली असून छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणाचे मागील प्रवेशद्वार (स्काऊट भवन कडील) महिलांसाठी राखीव आहे.

## आ.सोळंकेंसोबत निष्ठावंत

महिन्या पूर्वी मार्केट कमिटीच्या संचालकांना मुबंई वारी घडवून आणली पण यात कोणीच गळाला लागत नसल्याचे पाहून या संचालकांना भावी आमदारांनी बाजार समितीच्या मेसवर जेवू घातल्याची चर्चा मागील ६ महिन्यात हसून हसून पोट दुखेपर्यंत रंगली होती.त्यानंतर माजलगाव मार्केट कमिटीचे माजी सभापती व आ.सोळंके यांच्यावर नाराज असलेल्या संभाजी शेजूळ यांना गळला लावण्याच्या हालचाली सुरु केल्या असून शेजूळ आ.सोळंके विरोधात दंड थोपटण्यासाठी हळू हळू सज्ज होत असल्याचे मागील काही दिवसात स्पष्ट होऊ लागले आहे. आ सोळंके यांचे मागील तीन पिढ्यांपासून निष्ठावंत असलेले बाजार समितीचे माजी सभापती संभाजी शेजूळ अशोक डक यांच्या गळला लागल्या नंतर पुढचा नंबर कोणाचा अशी चर्चा शहरात रंगली आहे.अशोक डक आ.सोळंकेच्या जवळचे कोण कोण मुंबई मार्केट कमिटीच्या रेस्ट हाऊस व पैसाच्या जीवावर फोडून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना शह देतात याची उत्सुकता माजलगावकराना लागली आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस ( ?) पक्षाच्या विधानसभा प्रमुख पदी अशोक डक यांचे जेष्ठ बंधू नारायण डक हे मागील चार महिन्यापासून काम पाहत आहेत विधानसभेची उमेदवारी पण त्यांनाच मिळणार असल्याचे पदाधिकारी बोलतात त्या दृष्टीने अजित पवार यांच्या गटातुन काही मोहरे गळला लावून लोकसभेला अजित पवार गटात भूकंप घडवण्याच्या दृष्टीने अशोक डक मुंबई मार्केट कमिटीचा उपयोग करत असल्याचे राजकीय विश्लेषक सांगतात.

## शेतकऱ्यांनी राज्य

आहे आपल्या, दिल्लीच्या शेतकऱ्यांवर अन्याय होतोय. ज्यांच्या जोरावर मोदी पंतप्रधान झाले, त्याच्या घरी जातात मग ते शेतकरी तुमच्या घरी आलेत तर चालत नाही का? असेही ते म्हणाले. पाकिस्तान आणि चीनच्या सीमेवर सैनिक पाहिजे ते दिल्लीत आहेत, त्यांचे आई वडील शेतकरी आहेत. त्यांना रोखतात, मोठी भिंत लावतात. खिळे टाकतात. ज्या मातीत सोनं उगवतात त्याच मातीत शेतकऱ्यांनी यांना गाडले पाहिजे. मोदी धान्य नाही पिकवत. फडणवीस यांना काय बोलावे फरक पडत नाही. फडतूस बोलले, नालायक बोललो, काही फरक पडत नाही. निर्लज्ज सदादुखी आहेत. पाव मुख्यमंत्री आहे तरीही काही वाटत नाही. मिंध्याला मुख्यमंत्री बनवले, जे भाजपचे निष्ठावंत कार्यकर्ते आहे ते विचार करत असतील कोणासाठी काम करतोय या उपऱ्यासाठी का? अशी टीका त्यांनी मुख्यमंत्र्यांवर केली. मोदी सारखे महाराष्ट्रात येत आहेत. १९ तारखेला शिवनेरीवर येताय असे ऐकतो आहोत. कोस्टल रोडचे माझे स्वप्न होते, कोणीतरी उद्घाटन करतंय, आम्ही जळणारे नाही. पंतप्रधान उद्घाटन करत आहेत याचा अभिमान आहे. मुंबईमधील डायमंड मार्केट गुजरात, फिल्मफेअर गुजरातला मी मनकी बात नाही, जन की बात करण्यासाठी आलोय. पंतप्रधान येऊन काही बोलले तरी तुम्ही भुलणार नाही. जे भेकड, घाबरट असतील त्यांनी इथुन निघून जा. भाकड जनता पार्टीत जा. मी तुमच्यासाठी नाही जनतेसाठी मैदानात उतरलो आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

# शिवजन्मोत्सवानिमित्त सामाजिक उपक्रमाचे उत्साहात आयोजन

**माजलगाव । प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक तथा महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त दरवर्षीप्रमाणे १९ फेब्रुवारी रोजी पाटील साहेब प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मागील गेल्या सहा वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक माजलगाव या ठिकाणी पाटील साहेब प्रतिष्ठान च्या वतीने मोठ्या उत्साहात रक्तदान शिबिर, खिचडी वाटप, विद्युत रोषणाई, करून सेल्फी पॉईंटचे आयोजन करण्यात येते त्याचप्रमाणे या वर्षी देखील आयोजन केले आहे. या ठिकाणी रक्तदान शिबिरामध्ये शेकडो शिवभक्त रक्तदान करतात व त्या माध्यमातून वर्षभर सर्व जाती धर्मातील गरजूंना पाटील साहेब प्रतिष्ठानच्या वतीने मोफत रक्तपुरवठा केला जातो. या रक्तदान शिबिराच्या माध्यमातून एक मोठी समाजसेवा नवतरुणांच्या होत आहे. यावर्षी देखील मोठ्या संख्येने शिवभक्तांनी उपस्थित राहून मोठ्या संख्येने रक्तदान करावे असे आवाहन पाटील साहेब प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष राम नरवडे, गणेश तौर व सर्व सदस्यांच्या वतीने करण्यात केले आहे.

# किर्तन महोत्सवाला सुरूवात

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील आडोळा येथे दि. १७ फेब्रुवारी २०२४ रोजी किर्तन महोत्सवाला ज्ञानेश्वर माउली तावरे यांच्या हरिकिर्तनाने सुरूवात झाली असुन संगीत रामकथा, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा होणार असुन कथा प्रवक्ते दिलीप महाराज पवार हे आहेत तर आज दि. १८ फेब्रुवारीला सायं. समाधान महाराज शर्मा यांचे हरिकिर्तन होणार आहे. या महोत्सवात पहाटे काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, संगीत रामायण, हरिपाठ व हरिकिर्तने होणार आहेत. यामध्ये दिलीप म. पवार, नामदेव म. फपाळ, बालकिर्तनकार चैतन्य म. राउत, पांडुरंग म. शितोळे, माउली म. करंजीकर यांची हरिकिर्तने होणार आहेत तर उध्दव बापु शिंदे यांचे संगीत भजन देखिल होणार आहे. या महोत्सवात राज्यातील दिग्गज कलावंतांची उपस्थिती असणार आहे. दि. २४ फेब्रुवारी रोजी उमेश म. दशरथे यांच्या हरिकिर्तनाने महोत्सवाची सांगता होणार असुन याचा पंचक्रोषीतील भाविक - भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक युवा तबला वादक वैभव म. सोळंके व आडोळा ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.


## जाहिर प्रगटन

**मा. श्री.आर.जी.बागडे साहेब**
**४ थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर बीड यांचे न्यायालयात**
**विशेष दिवाणी दावा क्र. ६१/२०१७**
**स्टेट बँक ऑफ इंडिया वादी**
**विरूध्द**
**जयश्री गोरख वाघमारे व इतर प्रतिवादी**
**प्रति, २) लक्ष्मीकांत पि. रामविलास बियाणी, वय सज्ञान, धंदा व्यापार, रा.शास्त्रीनगर, नालवंडी रोड,बीड**

ज्याअर्थी, प्रति, अर्जातील वादी यांनी रिकव्हरीचा सूट प्रतिवादी विरूध्द या न्यायालयात दाखल केला आह, त्या सबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक २७/०३/२०२४ रोजी दिवसा १०.३० वाजता तुम्ही स्वत: किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबंधीच्या महत्त्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देवू शकेल अशा वकिलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्यादिवशी तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याचदिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद सेट ऑफ, किंवा प्रविाद काऊंटर क्लेम, ज्या दस्तऐवजांवर आधारला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या स्टेट ऑफ, किंवा प्रतिवादाच्या काऊंट क्लेम, पुष्ट्यार्थ, पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची करून ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनात जोडावी. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास, तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र आहे.

**आज दिनांक १६/०२/२०२४ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिले.**

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून. स्वाक्षरीत अधिक्षक, दिवाणी न्यायालय,व.स्तर,बीड.

मार्फत अॅड.शिंदे

## जाहिर प्रगटन

**मा.अविनाश म.पाटील ५ वे दिवाणी न्यायाधीश क.स्तर,बीड,ता.जि.बीड यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर १८१/२०२४**
**निलावती व ईतर वि.निरंक**

ज्यापेक्षा **श्रीहरी बंडु मस्के**, रा. मौजे पालवण, ता.जि.बीड हे दिनांक १२/०६/२०१४ रोजी मयत झालेले आहेत. आणि तसेच अर्जदार

**१) निलावती शिवाजी मस्के, पत्ता पालवण, ता.जि.बीड, २) मनिषा सुरेश मस्के, पालवण, ता.जि.बीड, ३) शंकर सुरेश मस्के, पालवण, ता.जि.बीड, ४) ओंकार सुरेश मस्के, पालवण, ता.जि.बीड, ५) मोहिनी रविंद्र शेंदाडे, पिंपरगव्हाण, ता.जि.बीड, ६) रोहिणी संदीप शेळके, पालवण, ता.जि.बीड.**

अर्जदार क्र. १ ही **मयत श्रीहरी बंडु मस्के** यांची भावजयी असून अर्जदार क्र. २ ही मयताची चुलती म्हणजेच मयताचा सख्खा भाऊ शिवाजी बंडू मस्के यांची सून व मपयत पुतण्या सुरेश शिवाजी मस्के यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. ३ व ४` मयताचे चुलत नातू म्हणजे मयत पुतण्या सुरेश शिवाजी मस्के यांची मुले आहेत. अर्जदार क्र. ५ व ६ या मयताच्या विवाहित नाती म्हणते मतय पुतण्या सुरेश शिवाजी मस्के यांच्या मुली आहेत. या अर्जदारा व्यतीरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना/अर्जदारांना सदरहू **मयत श्रीहरी बंडु मस्के** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

**पु.ता. ०७/०३/२०२४**

**आज दिनांक १६/०२/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

क.लिपीक

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून स्वाक्षरीत/- अधिक्षक दिवाणी न्यायालय, व.स्तर,बीड.

मार्फत अॅड.उबाळे

## जाहिर प्रगटन

**मा.श्री.ओ.एन.मंत्री साहेब, २ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दि.अर्ज क्र. ३१७/२०१४**
**साबेराबी अहेमद पाशा अन्सारी व ईतर विरूध्द निरंक**

**अर्जदार : १) साबेरावी भ्र. अहेमद पाशा अन्सारी, रा.पात्रूड, ता.माजलगांव,जि.बीड, ह.मु. कटकपुरा, बुंदेलपुरा, बीड, ता.जि.बीड, २) मुख्तार पि. अहेमद पाशा अन्सारी, रा.वरीलप्रमाणे, ३) अन्सारी अझीज पि. अहेमद पाशा अन्सारी, रा.वरीलप्रमाणे, ४) शेख नसीर पि. अहेमद पाशा अन्सारी, रा. वरीलप्रमाणे, ५) अन्सारी शेख मुस्ताख पि. अहेमद पाशा अन्सारी, रा. वरीलप्रमाणे.**
**विरूध्द निरंक**

**मागणी : बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत अहेमद पाशा मो. फयाजोद्दिन अन्सारी** यांचा मृत्यू झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत अहेमद पाशा मो. फयाजोद्दिन अन्सारी** यांचा मृत्यू दिनांक १२/११/२०१९ रोजी झाला आहे. यांचे मृत्यू वरील अर्जदाराशिवाय मयताचे कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

**मयत अहेमद पाशा मो. फयाजोद्दिन अन्सारी** यांच्या मृत्यूनंतर वरील अर्जदार यांना शासकीय/ निमशासकीय कामकाजासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सरहून मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू **मयत अहेमद पाशा मो.फयाजोद्दीन** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १७/०२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.**
**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २७/०३/२०२४ आहे.**

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून स्वाक्षरीत अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड

मार्फत अॅड.अंडील

## जाहिर प्रगटन

**मा.श्रीमती डी.के. पाटील कोर्ट नं. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज २९८/२०२४**
**सलीम व इतर विरूध्द निरंक**

**अर्जदार : १) सलीम पि. मोहम्मद पठाण, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. बेलखंडी (पाटोदा), ता.जि.बीड**

**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship Certifiacte) मिळणेबाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत नामे बानुबी भ्र. महमंद पठाण** यांचे बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी **मयत नामे बानुबी भ्र. महमंद पठाण**, रा.बेलखंडी (पाटोदा), ता.जि.बीड याचां मृत्यू दिनांक १५/९/२०२३ रोजी राहते घरी बेलखंडी (पाटोदा), ता.जि.बीड येथे झाला. अर्जदार हा मयताचा एकमेव मुलगा आहे. अर्जदाराला ईतर कोणी भाऊ किंवा बहिण नाही. मयताचे पती **पठाण महंमद कोंदन खॉ** हे दिनांक १२/०९/२०१० रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार हा मयताचा वारस आहे व मयतास सदर अर्जदाराशिवाय ईतर कुणीही वारस नाही.

वरील अर्जदारांना मयताचे मृत्यूनंतर वरिल अर्जदारांना कार्यालईन उपयोगासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. असे अर्जदार यांनी अर्जात नमूद केलेले आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर त्यांनी या जाहिर नाम्याच्या तारखेपासून एक महिन्यात या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळते की जर सदर मुदतीत कोणी आल्या योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबदद्ल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याना सदर **बानुबी भ्र. महंमद पठाण** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १५/०२/२०२४ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्कानिशी दिले.**
**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २६/०३/२०२४**

क.लिपीक

कोर्टाचा शिक्का

आदेशावरून स्वाक्षरीत/- अधिक्षक दिवाणी न्यायालय व.स्तर,बीड

मार्फत अॅड. नांदे

## माजलगावात फिजिओथेरपी शिबिर-डॉ.राधिका बजाज

माजलगाव - येथील गोवर्धन फिजिओथेरपी रिहॅबिलीटी हॉस्पिटलच्या वतीने दि १८ फेब्रुवारी ते १० मार्च दरम्यान फिजिओथेरपी शिबिराचे आयोजित करण्यात आले असून नोंदणी फिस १०० रुपये आहे.या शिबिराचा रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. राधिका बजाज यांनी केले आहे. दि १८ फेब्रुवारी ते १० मार्च दरम्यान समता कॉलनी मधील डॉ इंदानी हॉस्पिटलच्या पहिल्या मजल्यावर शिबिर घेण्यात येणार आहे. शिबिरामध्ये कोणतेही औषध न देता फिजिओथेरपीच्या माध्यमातून रुग्णावर उपचार करण्यात येणार आहेत.या उपचार पद्धतीमध्ये अर्धांगवायू,टाच दुखी, शस्त्रक्रिया नंतरचे व्यायाम व उपचार, मान दुखी, पाठ दुखी,कंबर दुखी, मणक्याची गादी सरकणे व पायाला मुंग्या येणे, संधीवात,कोपरदुखी, तोंड वाकडे होणे, मान दुखी, गुडघेदुखी, स्पाँनडेलोसिस, हातापायाचे व्यंग,मणका सरकणे आदी आजाराचार उपचार करण्यात येणार आहेत. तरी या उपचार पद्धतीचा जास्तीत जास्त रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ.राधिका बजाज यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर कामगारांचे मोबदल्यासांठी आंदोलन

गेवराई - अनेक दिवसांपासून वेळोवेळी मागणी करूनही तसेच अंदोलन करुनही प्रशासन थाऱ्यावर येईना अण घामाचा पैसा देईना, निर्दयी निगरगठ्ठ प्रशासनाला जागे करण्यासाठी दि. १५ गुरुवार रोजी अखेर गोदाम हमालांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर अर्धनग्र अंदोलन केले. मागील २३ दिवसांपासून शासकिय गोदामात हमाली करनाऱ्या हमालांची ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर २०२३ तसेच जानेवारी २०२४ या दरम्यान केलेल्या हमालीची केवळ दोन महिन्याची मजुरी दिली आहे. त्याचबरोबर गेल्या वर्षभरातील अनंदाचा शिधा किटची केवळ एक महिन्याची हमाली दिली आहे, ती पुर्ण देण्यात यावी. थेट वाहतूक कंत्राटदारांची नेमणूक जिल्हाधिकारी यांनी केली सदर वाहतुक ठेकेदाराकडे नोव्हेंबर, डिसेंबर २०२३ गोदाम हमालांनी काम केले त्याची मजुरी वाहतुक ठेकेदाराने पुरवठा विभागासाठी माथाडी बोर्डाने निश्चित केलेल्या हमाली दरानुसार माथाडी मंडळाकडे भरण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनाने द्यावेत. गोदाम हमालांना मार्च २०१२ पासून महागाई निर्देशंकाने फरक देण्याचे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिले असतांना मागील सात महिन्यापासून ते दिले नाहीत, तो तात्काळ देण्यात यावा. प्रत्येक गोदाम निहाय आवक जावक हमालांच्या सोयीसाठी एकाचवेळी करण्यात येवु नये यासाठी जिल्हास्तरावरुन नियोजन करण्यात यावे. अशा अनेक मागण्यांसाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गेवराई तालुक्यातील शेकडो गोदम हमालांचे प्रातिनिधिक धरणे आंदोलन सुरू आहे.

## वीज अंगावर पडल्याने एकाचा मृत्यू

नागपूर - आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी वाढ होण्याची शक्यता बळावली आहे. राज्यातील काही भागांसह विदर्भात कोसळणाखऱ्या दमदार अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. २०२३ च्या खरीप हंगामातील नैसर्गिक आपत्तीमुळे अगोदरच शेतकरी गारद झालेला आहे. त्यामुळे आता पुन्हा ढगाळ वातावरण आणि गुरुवारी दुपारच्या सुमारास अचानक अवकाळी पाऊस झाल्याने सोंगून ठेवलेला हरभरा, गहू तसेच सोंगणीला आलेल्या गहू, हरभऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच या आवकाळी पावसाने रब्बी पिकावर देखील मोठा परिणाम होणार असून गहू, हरबरा, तूर, संत्री, भाजीपालासह कांदापिकाचे देखील मोठे नुकसान झाल्याचे चित्र आहे. आवकाळी पावसाने रब्बी पिकावर मोठा परिणाम. नागपूर शहरासह विदर्भात सलग होणाऱ्या गारपीट आणि अवकाळी पावसाचा शेतकऱ्यांना सर्वाधिक फटका बसला आहे. या गारपिटीमुळे हरभरा गहू, तूर, भाजीपाला आणि फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. विदर्भातील सहा जिल्ह्यात आधीच हवामान विभागाकडून अलर्ट जारी करण्यात आला आहे. वेचणीला आलेला कापूस पावसात भिजल्याने कापसाचा वाती झाल्या असल्याचे चित्र आहे. त्यामुळे हाता तोंडाशी आलेला घास या अवकाळीने हिरावून घेतल्याने पुन्हा एकदा शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार काल सायंकाळी बुलढाणा जिल्ह्यात अचानक ढगाळ वातावरण तयार झाले आणि मेघ गर्जना होत दमदार पाऊस झाला. जवळपास एक तास जिल्ह्याच्या सर्वच भागात पाऊस कोसळला.

## वागळेंवर हल्ला करणाऱ्यांची परेड कधी काढणार ?

मुंबई : गेल्या दहा दिवसांपासून मी संपूर्ण महाराष्ट्रातील गुंड जे शिंदेंच्या पक्षात सामील होत आहेत, त्यांना मी जनतेच्या समोर आणत आहे. हे सरकार काय करत आहे? मुख्यमंत्री काय करतायेत? पुण्यात निखिल वागळे असिम सरोदे , विश्वंभर चौधरी यांच्यावर हल्ला झाला. पुण्याच्या नवनियुक्त पोलीस आयुक्तांनी गुंडांची परेड काढून मोठा शो केला. मग ज्या गुंडांनी निखिल वागळेंवर हल्ला केला. त्यांची परेड कधी काढणार, असा थेट सवाल शिवसेना ठाकरे गटाने यांनी पुणे पोलीस आयुक्तांना केला आहे. निखिल वागळेंवर हल्ला करणारे कोण गुंड आहेत? कोणत्या पक्षाचे गुंड आहेत हे? 'डर गये कमिश्नर' परेड तर त्यांची व्हायला पाहिजे होती. निखिल वागळे, असिम सरोदे, विश्वंभर चौधरी यांच्यावर हल्ला करणाऱ्यांवर कारवाई का नाही. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री त्या गुंडांचे समर्थन करत आहेत. या हल्ला करणाऱ्यांची देखील परेड काढली पाहिजे. त्यांनाही हातात बेड्या घालून रस्त्यावर फिरवा, तर तुम्ही पोलीस आयुक्त नाही तर तुम्ही भाजपचे कार्यकर्ते, असा घणाघात त्यांनी केला आहे.

# राज्य सरकारच्या धोरणांमुळे जनता त्रस्त

**नागपूर । वृत्तसेवा**

हरियाणा आणि पंजाब बॉर्डरवर शेतकऱ्यांवर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर बच्चू कडू माध्यमांशी बोलत होते. केंद्र सरकारचा निषेध करून त्यांनी शेतकऱ्यांचे आंदोलन चिघडू नये यासाठी सरकारने निर्णय घ्यावा अन्यथा आम्ही आंदोलनात सहभागी होऊ असा इशारा दिला आहे. अनेक गोष्टींची गॅरंटी मोदीजी देतात मग हमी भावाची गॅरंटी का देत नाही, असा सवालही त्यांनी केंद्र सरकारला विचारला. शेतकऱ्यांच्या सध्याच्या ज्या योजना आहेत,त्या योजनांमुळे शेतकऱ्यांच्या खिशामध्ये पैसे येत नाही उलट त्यांचा जेबकट होतो. त्यामुळे सरकारने ही डाकेखोरी बंद केली पाहिजे. सरकारने शेतकऱ्यांना हमीभाव द्यावा असे ते म्हणाले. दरम्यान अशोक चव्हाण यांच्या भाजप प्रवेशावर देखील बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली. विकासाच्या जाळ्यात अनेक जण आहेत. विकासाच्या जाळ्यात अडकल्यामुळे या सगळ्या गोष्टी होत आहेत. अशोक चव्हाण दोन वेळा मुख्यमंत्री होते. पंधरा वर्षे कॅबिनेट मंत्री राहिले. ते भाजपमध्ये का गेले हा त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे. मात्र लोकांच्या मनामध्ये संभ्रम असून ते भाजपमध्ये का गेले हे स्पष्ट झालं पाहिजे, असे बच्चू कडू म्हणाले. काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेसच्या विलीनीकरणाच्या सुरू असलेल्या चर्चेवर बोलताना, बच्चू कडू यांनी कोण कोणत्या पक्षात विलीन होईल, तो त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे असे सांगत हीच स्थिती राहिली तर विरोधकांची भूमिका प्रहारला पार पाडावी लागेल असे ते म्हणाले.

# भाजपाच्या सत्तेच्या काळात विरोधकांवर हल्ल्यावर हल्ले

**नगर । वृत्तसेवा**

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भाजप पक्षांतर्गत सूडबुद्धीच्या राजकारणामुळे 'घरचे राहिले उपाशी अन् काँग्रेसवाले तुपाशी' अशी अवस्था झाली आहे. भाजपमधील ओबीसी नेत्यांना संपवण्याचे पाप फडणवीस करत आहेत, असा आरोप शिवसेनेच्या (ठाकरे गट) उपनेत्या सुषमा अंधारे यांनी नगरमध्ये बोलताना केला. सुषमा अंधारे यांनी सिंदखेड राजा ते शिवाजी पार्क अशी 'मातृतीर्थ ते शिवतीर्थ' ही मुक्तसंवाद यात्रा सुरू केली आहे. १९ दिवसांपूर्वी सुरू झालेली ही यात्रा नगरमध्ये आली. त्यावेळी त्या पत्रकारांशी बोलत होत्या. यावेळी ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख शशिकांत गाडे, माजी महापौर भगवान फुलसौंदर, शहरप्रमुख संभाजी कदम, जिल्हा उपप्रमुख गिरीश जाधव आदी उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस हे पंकजा मुंडे यांचे राजकारण संपवत आहेत. त्यांच्या त्रासामुळे तावडे, बावनकुळे पक्षात त्रस्त आहेत, परंतु तावडे त्यांच्या तावडीत सापडले नाहीत. बावनकुळे यांनी भाटगीरी करत त्यांच्याशी जुळून घेतले आहे. एकनाथ खडसे त्यांच्या जाचामुळे बाहेर पडले. पंकजा मुंडे यांच्याऐवजी अशोक चव्हाण यांना राज्यसभेची उमेदवारी देण्यात आली. त्यामुळे मुंडे यांनी अन्याय सहन करू नये, अन्याय सहन करणारा अधिक जबाबदार असतो, त्यामुळे त्यांनी शिवसेनेत यावे असे सुषमा अंधारे म्हणाल्या. पत्रकार निखिल वागळे यांच्यावर हल्ला झाला, त्यावेळेस फडणवीस म्हणाले संयमाने बोललं पाहिजे. परंतु राणे पितापुत्रांची मुक्ताफळे, वाह्यात वक्तव्य जनक्षोभ आहे, त्यावेळेला गृहमंत्री असलेल्या फडणवीस यांना लोकशाहीची का आठवण होत नाही? राणे पितापुत्रांनी मराठा आंदोलकांबद्दल केलेली भाषा दुर्दैवी आहे. त्याविरोधात उमटलेली ती प्रतिक्रिया होती. या प्रतिक्रियेमुळे महाराष्ट्रात इतर ठिकाणी काहीही घडू शकते. महाराष्ट्रातील सौहार्दाचे वातावरण बिघडण्यास फडणवीस आणि त्यांची ब्रिगेड प्रयत्न करीत आहे. रामदास कदम यांनी उद्धव ठाकरे यांचीही ईडी चौकशी करा, अशी मागणी केली आहे तसेच ५० खोके घेतल्याचे सिद्ध झाल्यास भांडी घासेल असे सांगितले, त्याकडे लक्ष वेधले असता सुषमा अंधारे म्हणाल्या, रामदास कदम यांना झंडू बाम लावल्याशिवाय त्यांना रडू कोसळत नाही आणि ते खोटेही बोलू शकत नाही, त्यांचे वक्तव्य सुमार आहे. भांडी घासण्याच्या त्यांच्या लायकीच्या कामाची त्यांना लवकर जाणीव झाली, असा टोलाही त्यांनी लगावला. वांद्रे रिक्लेमेशनची जागा अंदानी समूहाला देण्यात आली, याकडे लक्ष वेधले असता सूषमा अंधारे म्हणाल्या, पंतप्रधान मोदी गरिबांना काही देत नाहीत, मात्र त्यांच्या मित्रांना सर्व काही देत आहेत. फडणवीस आणि त्यांच्या ब्रिगेडने गुजरातचे मुनीम म्हणून काम पाहावे 'सब भूमी अदानी की' अशा पद्धतीचे निर्णय होत आहेत.

# माजी सैनिकांची सैनिक प्रशिक्षण म्हणून नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान या संस्थेच्या अहमदनगर जिल्ह्यातील नेवासा फाटा, शेवगाव, ढोरजळगावने, तेलकुडगाव, घोगरगाव, श्रीरामपूर तसेच अमरावती जिल्ह्यातील धामणगाव रेल्वे येथील शैक्षणिक संकुलात गुरुकुल, निवासी वस्तीगृहयुक्त इयत्ता पहिली ते बारावीपर्यंतच्या सैनिकी धरतीवर निवासी शाळा कार्यान्वित आहे. प्रत्येक शैक्षणिक संकुलामधील वस्तीगृहातील विद्यार्थ्यांचे दैनंदिन सकाळची पीटी, ड्रिल तसेच संध्याकाळचे स्पोर्ट्स सराव, खेळाचे प्रशिक्षण देण्यासाठी इच्छुक माजी सैनिकांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. साधारणतः सैन्य दलामध्ये १५ वर्षे सेवा बजावलेले व वयाचे ५५ वर्षाचे आतील एनसीओ, जेसीओ रँकच्या ५० माजी सैनिकांची सैनिकी प्रशिक्षक म्हणून संस्था नियुक्ती करणार आहे. अर्हता धारक माजी सैनिकांकरिता सैनिकी प्रशिक्षक पदाकरिता दरमहा रूपये २५,०००/- ते ४५०००/- दरम्यान रोखीने मानधन देय राहील. सदरच्या नियुक्त शैक्षणिक वर्ष निहाय म्हणजेच प्रत्येक वर्षाच्या १५ जून ते १५ एप्रिल या कालावधीसाठी असून २ वर्ष सेवेनंतर उमेदवाराच्या परफॉर्मन्स नुसार परमनंट केले जाते. ईपीएफ तसे संस्थेच्या धोरणानुसार पाल्यांना शिक्षणाची सुविधा अत्यल्प फीजमध्ये उपलब्ध आहे. वसतिगृहामध्ये राहून रेक्टरशिप करणाऱ्या उमेदवारांना निवास व भोजन सुविधा मोफत राहील पती-पत्नी दोघांनाही अहर्तानुसार नोकरी देण्याचे संस्थेचे धोरण आहे. संस्थेच्या प्रत्येक संकुलामध्ये फॅमिली क्वार्टर उपलब्ध आहे. तरी बीड जिल्ह्यातील इच्छुक माजी सैनिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी लेफ्टनंट कर्नल शरद प्रकाश पांढरे (सेवानिवृत्त) यांनी केले आहे.

# राज्यभरातील एसटी आगारातील स्वच्छतेसाठी विशेष मोहीम

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात नुकतीच पाच हजार विद्युत बस दाखल झाल्या असून या बसचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाले. मात्र, यावेळी शिंदे यांनी एसटी आगारांच्या स्वच्छतेबाबत नाराजी व्यक्त केली. तसेच तत्काळ राज्यातील एसटी आगार, बस स्थानकांची स्वच्छता करण्याचे आदेश त्यांनी दिले. त्यानंतर एसटी महामंडळाने संपूर्ण मार्च महिन्यात राज्यातील एसटी आगारातील प्रसाधनगृहांची स्वच्छता पाहण्यासाठी विशेष तपासणी मोहीम आखली आहे. या मोहिमेत कामचुकारपणा करणाऱ्या आगार व्यवस्थापकांवर कारवाई करण्याचे आदेश एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय



संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी दिले आहेत. एसटी आगारांच्या स्वच्छतेसाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियान राबवले जात आहे. त्यासाठी एमआयडीसीकडून ६०० कोटी रुपये निधी देण्यात आला आहे. त्यानुसार मागील आठ महिन्यांपासून काम सुरू आहे. परंतु ठाण्यामधील खोपट एसटी स्थानकातील असुविधांबाबत मुख्यमंत्री शिंदे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यानंतर एसटीच्या अधिकाऱ्यांना याबाबत प्रश्न विचारून समस्येचे निवारण करण्याच्या सूचना दिल्या. राज्यभरातील सुमारे ५४ लाख प्रवासी दररोज एसटीने प्रवास करतात. एसटी आगार, बस स्थानकांतील प्रसाधनगृहात स्वच्छता असावीत अशी अपेक्षा या प्रवाशांना असते. मात्र, प्रसाधनगृहे अस्वच्छ असल्याबद्दल प्रवासी वारंवार एसटी महामंडळाकडे तक्रारी करीत असतात. परिणामी, प्रसाधनगृहांच्या स्वच्छतेबाबत १ ते ३१ मार्चदरम्यान विशेष स्वच्छता तपासणी मोहीम राबवण्यात येत आहे. मध्यवर्ती कार्यालयातील अधिकारी कोणतीही पूर्वसूचना न देता राज्यातील सर्व प्रसाधनगृहाना भेटी देणार आहेत. यावेळी प्रसाधनगृहे अस्वच्छ दिसल्यास संबंधित संस्थेवर दंडात्मक कारवाई करून त्या संस्थेचा ठेका रद्द करण्यात येणार आहे. तसेच त्यांना काळ्या यादीत टाकण्याची शिफारस करण्याचे अधिकार संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. महामंडळातर्फे सुविधा उपलब्ध करण्यात येत असलेल्या प्रसाधनगृहात कोणतीही त्रुटी आढळल्यास आगार व्यवस्थापकावर शिस्त व अपील कार्यपध्दतीनुसार कारवाई करण्यात येईल, अशा सूचना एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी दिल्या आहेत.

## राज्यसभेच्या सहा जागांसाठीची निवडणूक बिनविरोध होणार

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्याच्या राजकारणातील मोठी बातमी समोर आली आहे. राज्यसभा निवडणुकीमध्ये मोठा ट्विस्ट आला आहे. सहा जागांसाठी राज्यसभेची निवडणुक होणार आहे. या सहा जागांसाठी सात जणांनी अर्ज केले होते, त्यामधील एका उमेदवाराचा अर्ज छाननीत बाद झाला आहे. त्यामुळे आता निवडणुक बिनविरोध होणार आहे नेमका कोणत्या उमेदवाराचा अर्ज बाद झाला आणि का? महाराष्ट्रातून राज्यसभेच्या सहा जागांसाठीची निवडणूक बिनविरोध झाली आहे. या निवडणुकीसाठी दाखल झालेला अपक्ष उमेदवाराचा सातवा अर्ज छाननीत बाद झाला आहे. २० फेब्रुवारी ही उमेदवारीला अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख असून त्यादिवशी याबाबतची अधिकृत घोषणा केली जाईल. राज्यसभेच्या सहा जागांसाठी सातजणांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. भाजपकडून अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी, अजित गोपछडे या तिघांनी अर्ज केले. तर, शिवसेनेकडून मिलिंद देवरा, राष्ट्रवादीकडून प्रफुल्ल पटेल तर काँग्रेसकडून चंद्रकांत हांडोरे यांनी अर्ज दाखल केले. तर अपक्ष म्हणून विश्वास जगताप यांनी अर्ज भरला होता. मात्र, या निवडणुकांसाठी सूचक, अनुमोदक म्हणून आमदारांच्या सह्या लागतात. त्याची पुर्तता जगताप यांच्याकडून करण्यात आली नाही. त्यामुळे त्यांचा अर्ज छाननीत बाद करण्यात आलं.

# बीड लोकसभा मतदार संघाला मिळणार नवीन चेहरा ?

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीला महिनाभराचा कालावधी शिल्लक राहिलाय. कोणत्याही क्षणी निवडणूक आयोगाकडून लोकसभा निवडणुकीची घोषणा होऊ शकते. महाराष्ट्रातही प्रत्येक पक्षाने लोकसभेची तयारी सुरु केली आहे. प्रत्येक मतदारसंघाची चाचपणी केली जात आहे. मराठवाड्यातील बीड मतदारसंघाकडेही प्रत्येक पक्षाचं लक्ष आहे. बीड लोकसभा निवडणुकीसाठी भाजप कोणाला उमेदवारी देणार? असा प्रश्न समोर येत आहे. दहा वर्ष भाजपाकडून खासदार राहिलेल्या डॉक्टर प्रीतम मुंडे यांना तिसऱ्यांदा भाजप लोकसभेच्या रणांगणात उतरवणार की पंकजा मुंडे यांना भाजप दिल्लीला पाठवणार? याची चर्चा बीडमध्ये सुरु आहे. याचं उत्तर अवघ्या काही दिवसात समजेल. बीडच्या लोकसभेच्या जागेवर भाजपाचं वर्चस्व राहिलं आहे. भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे हे सुद्धा बीड लोकसभेत निवडून पुढे केंद्रामध्ये कॅबिनेट मिनिस्टर झाले होते. त्यांच्या पश्चात त्यांच्या कन्या डॉक्टर प्रीतम मुंडे या २०१४ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये पहिल्यांदा लोकसभा निवडणुकीला समोरं गेल्या आणि निवडून सुद्धा आल्या. त्यानंतर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत सुद्धा प्रीतम मुंडे दुसऱ्यांदा खासदार म्हणून निवडून गेल्या. राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध भाजपा असाच संघर्ष कायम बीड लोकसभा निवडणुकीमध्ये आतापर्यंत पाहायला मिळाला. वरवर हा राजकीय संघर्ष दोन पक्षांमधील वाटत असला तरी मराठा विरुद्ध ओबीसी संघर्षाची किनार बीड लोकसभेच्या निवडणुकीला कायम राहिलेली आहे. मराठवाड्याच्या एकूण राजकीय इतिहासात बीड जिल्ह्यातील निवडणुका कायम संवेदनशील राहिले आहेत, मात्र केवळ संवेदनशीलच नाही तर बीड जिल्ह्यातील मतदारांनी मातब्बर नेते संसदेत पाठवलेले आहेत. साताराचे क्रांतिसिंह नाना पाटील हे तर बीडचे पहिले खासदार त्यानंतर बबनराव ढाकणे असतील.. कायम बीडच्या जनतेने लोकसभा निवडणुकीमध्ये बाहेरच्या जिल्ह्यांच्या नेत्यांना सुद्धा मोठी ताकद दिली आणि त्यांना आपले लोकप्रतिनिधी बनवले. एकीकडे बीड हा भाजपचा गड मानला गेला असला तरी याच बीड जिल्ह्यावर राष्ट्रवादी काँग्रेस म्हणजे शरद पवार यांच्या पक्षाची सुद्धा मोठी ताकद राहिलेली आहे. काँग्रेस आणि राष्ट्रवादी असे आघाडी सरकार राज्यात असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यातील दोन नंबरचे सर्वात जास्त आमदार हे याच बीड जिल्ह्याने निवडून दिले होते म्हणून बीडच्या लोकसभा निवडणुकीमध्ये शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध भारतीय जनता पार्टी यांच्यामध्ये कायम संघर्ष पाहायला मिळाला आहे. काही दिवसावर येऊन ठेपलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये मात्र भाजपचा उमेदवार कोण त्याची जोरदार चर्चा सुरू आहे. भाजपाच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांचा परळी विधानसभा मतदारसंघांमध्ये २०१९ मध्ये पराभव झाला आणि त्यानंतर मात्र अनेक विधान परिषदेच्या निवडणुकीमध्ये पंकजा मुंडे यांना आमदारकी मिळेल अशा चर्चा रंगल्या. पात्र पंकजा मुंडे यांना भारतीय जनता पार्टी कडून उमेदवारी देण्यात आली नाही. अगदी काल-परवा ज्या राज्यसभेच्या निवडणुका झाल्या, त्याही राज्यसभेच्या जागेमध्ये पंकजा मुंडे यांना राज्यसभेची उमेदवारी मिळणार अशा जोरदार चर्चा झाल्या. मात्र पंकजा मुंडे यांना राज्यसभेचे तिकीट मिळालेच नाही.

## जुन्या कुणबी नोंदी असलेल्यांना मराठा आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही -मुख्यमंत्री

**मुंबई । वृत्तसेवा**

राज्य मागासवर्गाचा मराठा सर्वेक्षण अहवाल सरकारकडे सादर करण्यात आला आहे. यावेळी मुख्यमंत्री



एकनाथ शिंदेंनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील उपस्थित होते. या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, राज्य मागासवर्गाचा मराठा सर्वेक्षण अहवाल मंत्रिमंडळात सादर होईल. अहवालावर मंत्रिमंडळ बैठकीत चर्चा करुन निर्णय घेतला जाईल. २० फेब्रुबारीला विशेष अधिवेशन घेतलं जाईल. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा आरक्षण मिळेल. इतर समाजाच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही. आयोगानं जलद गतीनं सर्वेक्षण पूर्ण केलं. कुणबी नोंदी नसलेल्यांना मराठा आरक्षणाचा लाभ मिळेल. मराठा समाजाला टिकणारं आरक्षण देण्याचा प्रयत्न. सरकारची भूमिका स्पष्ट, टिकणारं आरक्षण देणार. सव्वा दोन कोटींपेक्षा जास्त कुटुंबांचे सर्वेक्षण यामध्ये करण्यात आले. मागासवर्गीय आयोगाचा हा अहवाल आता मंत्रिमंडळ बैठकीत ठेवला जाईल. त्यामध्ये चर्चा करुन शासन निर्णय घेईल. त्यासाठी विशेष अधिवेशन २० फेब्रुवारीला होईल. असं मुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

# भाजपामुळे महाराष्ट्रात अराजकता

**मुंबई । वृत्तसेवा**

भाजपामुळे राज्याची संस्कृती आणि संस्कार पूर्ण बिघडले आहेत. चिखलफेक करण्यासाठी भाजपने काही टोळ्या भाड्याने घेतल्या आहेत. महाराष्ट्राची संस्कृती लयाला जाताना दिसत असून त्याला जबाबदार पूर्णपणे देवेंद्र फडणवीस , अमित शाह , नरेंद्र मोदी आणि त्यांचा सध्याचा भारतीय जनता पक्ष आहे, अशी प्रतिक्रिया शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी चिपळूण येथे झालेल्या राड्यावरून दिली आहे. संजय राऊत म्हणाले की, भाजपामुळे राज्याची संस्कृती आणि संस्कार पूर्ण बिघडले आहेत. चिखलफेक करण्यासाठी भाजपने काही टोळ्या भाड्याने घेतल्या आहेत. पुरोगामी महाराष्ट्राला एक राजकीय संस्कृती होती. यशवंतराव चव्हाणांपासून ते आतापर्यंत त्या संस्कृतीवर नशेच्या, दारूच्या, अनैकतेच्या गुळण्या टाकण्याचे काम भाजपने काही भाडोत्री लोकांकडून सुरु केले आहे. आम्ही सुद्धा कठोर शब्दांचा वापर करतो. आमच्याकडून एखादा-दुसरा शब्द चुकीचाही जात असेल. मात्र ज्या पद्धतीने भाजपने जो दारूखाना सुरु केलाय. त्यावरून मला महाराष्ट्राची संस्कृती लयाला जाताना दिसत आहे. त्याला जबाबदार पूर्णपणे देवेंद्र फडणवीस, अमित शाह, नरेंद्र मोदी आणि त्यांचा सध्याचा भारतीय जनता पक्ष आहे, असे त्यांनी म्हटले आहे. इलेक्टोरल बॉण्ड निकालावर संजय राऊत म्हणाले की, गौतम अडाणी आणि भारतीय जनता पक्ष वेगळे नाही. इलेक्टोरल बॉण्डचा जो विषय आहे त्याला सर्वोच्च न्यायालयाने फटकार दिली आहे. ज्यांनी इलेक्टोरल बॉण्ड विकत घेऊन भारतीय जनता पक्षाची तिजोरी भरली आहे त्यांची नावे जाहीर करा ही सूचना सर्वोच्च न्यायालयाने दिली आहे. त्यात अडाणींचे नाव सर्वात वर आहे. मला खात्री आहे अशा प्रकारचे ठेके उद्योगपतींना द्यायचे आणि त्या बदल्यात शेकडो कोटींचे इलेक्टोरल निवडणूक निधी म्हणून बॉण्ड घ्यायचे, हा भारतीय जनता पक्षाचा गोरख धंदा आहे.

## खरेदी-विक्री संघाची निवडणूक बिनविरोध

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ मर्यादित बीडच्या अध्यक्षपदी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे कट्टर समर्थक जगदीश काळे यांची तर उपाध्यक्षपदी बबन गवते यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. बीड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ मर्यादीत बीड संचालक मंडळाची निवडणूक गेल्या ५ फेब्रुवारी रोजी बिनविरोध झाली होती. शुक्रवार दि.१६ फेब्रुवारी रोजी अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी नवनिर्वाचीत संचालक मंडळाची बैठक उपनिबंधक कार्यालयात बोलविण्यात आली. यात अध्यक्षपदासाठी जगदीश काळे यांचा तर उपाध्यक्ष पदासाठी बबन गवते यांचे प्रत्येकी एक अर्ज दाखल झाल्याने अध्यक्षपदी जगदीश काळे तर उपाध्यक्षपदी बबन गवते यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून आर.एम. मोटे यांनी काम पाहिले तर त्यांना सतीश बेटकर, सिध्देश्वर सांगुळे यांनी सहकार्य केले.

## शिवजन्मोत्सव सोहळा समिती कार्यालयाचे उद्घाटन

बीड - शिवप्रेमी शिक्षक प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आयोजित शिवजन्मोत्सव सोहळा समिती कार्यालयाचे उद्घाटन प्रा. सत्येंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. बीड शहरातील शिवप्रेमी शिक्षक समितीने एक आगळयावेगळया पद्धतीने प्रबोधनात्मक शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला आहे. १८ पगड जातीच्या एकोप्याचा छत्रपती शिवाजी महाराजाचा मूळ विचार समाजामध्ये घेऊन जाण्यासाठी जिल्ह्यातील शिक्षक सरसावला आहे. बीड शहरातील सर्व शिक्षण संस्था व जिल्हा परिषदेच्या शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी एकत्रित येऊन शिवजन्मोत्सव सोहळा साजरा करण्याचे ठरवले आहे. महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रातील हा पहिलाच प्रयोग ठरला आहे. सदरील सोहळा उत्सव समिती गठित झाल्यानंतर समितीच्या कामकाजासाठी प्रयागमाधव, शिवाजीनगर जुने अंजली हॉटेलच्या पूर्वेस रुबाब कपड्याच्या दुकाना शेजारी कार्यालय स्थापन करण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन बुधवार दि.१५ रोजी प्रा. सत्येंद्र पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इतिहासात मोठ्या प्रमाणात मोडतोड

**माजलगाव । प्रतिनिधी**

स्वाधीनता आंदोलनात हिंदी भाषेचे स्थान मोलाचे असल्याचे प्रतिपादन केंद्रीय विश्वविद्यालय हैदराबाद येथील सहयोगी प्रा. डॉ.प्रकाश कोपर्डे यांनी केले. येथील भा. शि प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री. सिद्धेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हिंदी भाषेच्या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या उद्घाटन कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे तर व्यासपीठावर संकुलाचे स्थानिक अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी,प्राचार्य डॉ. सुहास मोराळे हिंदी विभाग प्रमुख डॉ.युवराज मुळये,डॉ.गंगाधर उषमवार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या आरंभी मान्यवरांच्या हस्ते हिंदी शोधालेख अंकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुहास मोराळे यांनी मनोगत व्यक्त करताना करताना म्हटले की, देशाच्या स्वातंत्र्यामध्ये हिंदी भाषेचे महत्व अतुलनीय आहे. सर्व भाषांना एका सूत्रात बांधण्याचे कार्य हिंदी भाषेने केले आहे. कार्यक्रमाचे प्रमुख उदघाटक डॉ.प्रकाश कोपर्डे यांनी म्हटले की, इंग्रजानी आपल्या इतिहासात मोठ्या प्रमाणात मोडतोड बदल केला परंतु त्याचे मंथन होण्याची गरज आहे. चर्चासत्रामध्ये वादविवाद आणि संवाद होण्याची गरज आहे.स्मृति,मति और प्रज्ञा या गुणांचा अंगीकार साहित्यामध्ये अंतर्भूत होणे गरजेचे आहे. अध्यक्षीय समारोप करताना कार्यक्रमाचे अध्यक्ष अमरनाथ खुर्पे यांनी म्हटले की,स्वातंत्र्य आंदोलनामागे राजकीय, सामाजिक आणि आर्थिक हेतू काय होता हे समजण्याची गरज आहे.आपल्या देशाबद्दल इतरदेशांचे विचार काय आहेत हे समजण्यासाठी तेथील वर्तमानपत्र काय लिहतात हे समजण्याची गरज आहे.

## कराटे मार्शल आर्ट असोसिएशन समारंभ संपन्न

**माजलगांव । प्रतिनिधी**

कराटे मार्शल आर्ट असोसिएशन माजलगाव आयोजीत बेल्ट वितरण समारंभ दिनांक १५ फेब्रुवारी गुरुवार रोजी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचे संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध हृदय रोग तज्ञ डॉ.श्रेयश देशपांडे, पोलिस उपनिरिक्षक विजयसिंह जोनवाल,दंतरोग तज्ञ डॉ.अरुण मुंडे, आप्पाराव डोंगरे यांची उपस्थिती लाभली.करा‍टे मार्शल आर्ट चे मार्गदर्शक चंद्रमणी डोंगरे मागील ३० वर्षा पासून माजलगांव तालुक्यातील विद्यार्थ्यांना कराटे,आर्चरी ( धनुर्विद्या ),नानचॉक,स्टिक,योगा, फाईट,जंप मोव्हमेंट,तलवारबाजी सह सेल्फ डिफेन्स सारखे प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना संस्कारीत करत आहेत.याप्रसंगी मान्यवरांनी चंद्रमनी डोंगरे सर व सहभागी विद्यार्थांचे कौतुक करून प्रोत्साहीत केले. यावेळी सहभागी पालक वर्गानं मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. सिदफना पब्लिक स्कूल चे सखाराम जोशी सर यांनी सुत्रसंचलन केले तर पत्रकार अमर साळवे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सौ.कविताताई डोंगरे,कुशल डोंगरे,यश सक्राते,अभिजित राठोड,प्रसेनजीत माने आदिंनी परिश्रम घेतले.

# पिस्तुलाचा धाक दाखवून ३९ लाखांची रक्कम लंपास

**बीड । प्रतिनिधी**

दिवसभराचे कामकाज आटोपून पतसंस्थेत जमा झालेली रक्कम सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी निघालेल्या कॅशियरला तीन चोरट्यांनी रस्त्यात अडवून पिस्तूल आणि चाकूचा धाक दाखवून त्याच्या जवळील जवळपास ३९ लाख रुपयांची रक्कम लुटल्याची घटना अंबाजोगाईत शुक्रवारी (दि.१६) रात्री घडली. सूत्रांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, अंबाजोगाई शहरातील प्रख्यात असलेल्या राजर्षी शाहू पतसंस्थेचे कॅशियर गणेश देशमुख हे शुक्रवारी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास दैनंदिन कामकाज आटोपून दिवसभरात जमा झालेली जवळपास ३९ लाख रुपयांची रक्कम सुरक्षित ठिकाणी ठेवण्यासाठी सेवकासोबत दुचाकीवरून निघाले होते. ते मुकुंदराज कॉलनीत आले असता त्यांच्या पाळतीवर असलेल्या तिघा चोरट्यांनी त्यांना अडविले. स्वतः जवळील पिस्तूल काढून त्यांनी ती देशमुख यांच्या डोक्याला लावली. पिस्तूल आणि त्यासोबत चाकूचा धाक दाखवून त्यांनी देशमुख यांच्याकडील ३९ लाख रुपये रक्कम ठेवलेली बॅग घेतली आणि पसार झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, भर वस्तीत घडलेल्या या घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

## नाला सफाई करताना सापडला मृतदेह

**बीड । प्रतिनिधी**

नगर पालिकेकडून शहरातील मोठ्या नाल्यांची स्वच्छता करण्याचे काम बुधवारी सुरू होती. शहरातील सुभाष रोडवर सार्वजनिक शौचालयाच्या समोरील १० फुट खोल व ६ फुट लांब असलेल्या मध्यवर्ती नाल्यातून जेसीबीद्वारे कचरा काढला जात होता. पहिले दोन खोरे कचरा काढल्यानंतर तिसऱ्या खोऱ्यात कचऱ्याऐवजी मृतदेहच बाहेर आला. हा प्रकार दुपारी साडे चार वाजता घडला. घटनास्थळी पालिका व बीड शहर पोलिसांनी धाव घेत मृतदेह जिल्हा रूग्णालयात नेला. बीड नगर पालिकेकडून शहरातील मोठ्या नाल्यांची १० ते १५ दिवसाला नियमित सफाई केली जात होती. बुधवारीही पालिकेचे अधिकारी, कर्मचारी हे जेसीबीच्या सहाय्याने सुभाष रोडलगत असलेल्या मध्यवर्ती नाल्याची सफाई करत होते. दुपारी साडे चार वाजेच्या सुमारास सार्वजनिक शौचालच्या समोरील कचरा काढत असताना अचानक जेसीबीच्या खोऱ्यात पुरूषाचा मृतदेह अडकून बाहेर आला.

# सरकारकडे मराठा समाजाची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी आंदोलकांनी आ.धसांची घेतली भेट

**आष्टी । प्रतिनिधी**

मराठा समाज आरक्षणाची अंमलबजावणी करावी यासाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील हे उपोषणास बसलेले आहेत.परंतु अद्याप पर्यंत सरकारने काढलेल्या अधिसूचना व अध्यादेश यांची अंमलबजावणी केलेली नाही.तसेच दिवसेंदिवस जरांगे पाटील यांची तब्येत ढासळत असल्याने सरकारने तातडीने आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा या मागणीसाठी आणि सरकारकडे मराठा लोकप्रतिनिधी म्हणून समाजाची बाजू भक्कमपने मांडण्यासाठी शुक्रवारी दुपारी एक वाजता आ. सुरेश धस यांचे निवासस्थानी मराठा आंदोलकांनी आ.धस यांची भेट घेत येणाऱ्या दोन दिवसीय अधिवेशनात आरक्षणाच्या विषयावर समाजाची मागणी जोरदारपणे मांडण्याचे आवाहन केले. मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न दिवसेंदिवस चिघळत चालल्याचे दिसत असून याचाच एक भाग म्हणून शुक्रवारी दुपारी आ.सुरेश धस यांच्या निवासस्थानी शिरूर कासार तालुक्यातील दासखेड,घाटनांदुर, जेधेवाडी, वडाळी यासह



पंचक्रोशीतील मराठा समाज बांधवांनी भेट घेतली.यावेळी त्यांनी आ.धस यांना समाजाच्या भावना तीव्र असल्याचे सांगत समाजाच्या संयमाचा अंत या सरकारने पाहू नये.शिवाय एक लोकप्रतिनिधी म्हणून आ.धस आपल्याकडे समाज फार मोठ्या अपेक्षेने पाहत असल्याचे सांगत आपण आरक्षण विषयी वेळोवेळी सभागृहात समाजाच्या बाजूने ठामपणे आपली भूमिका मांडत आला आहात हीच भूमिका घेऊन येणाऱ्या २० फेब्रुवारीच्या अधिवेशनात देखील आपण आपली भूमिका समाजाच्या बाजूने समाजाला पूर्णपणे आरक्षण मिळेपर्यंत ठामपणे उभे राहण्याचे आवाहन उपस्थित मराठा समाज बांधवांनी आ.धस यांना केले आहे. सुरेश अण्णांचा सार्थ अभिमान. यावेळी आंदोलकांनी आमदार सुरेश आण्णा धस यांच्या विषयी समाजाची प्रतिनिधी म्हणून आम्हाला सार्थ अभिमान आहे त्यांनी वेळोवेळी विधान परिषदेच्या सभागृहात मराठा समाजाच्या आरक्षणावर आपली भूमिका ठोसपणे मांडली त्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो परंतु मराठा लोकप्रतिनिधीनी देखील आता आपली भूमिका स्पष्ट करणं गरजेचे असल्याचे सांगत अभी नही तो कभी नही म्हणत सपोर्ट करा सपोर्ट करा जरांगे पाटलांना सपोर्ट करा अशा घोषणा दिल्या. समाजाच्या तीव्र भावना लक्षात घेता आरक्षणाच्या बाबतीत सरकारकडे निश्चितपणे आपल्या भावना कळविण्यात येतील. आणि मला विश्वास आहे की शिंदे,फडणवीस,पवार यांच सरकार समाजाला निश्चितपणे येणाऱ्या अधिवेशनात आरक्षण देईल असा विश्वास व्यक्त केला.आणि आपल्या म्हणण्याप्रमाणे मी इथून मागे देखील आरक्षणाच्या प्रश्नावर वारंवार पाठपुरावा करत आलो आहे आणि इथून पुढेही करत राहणार.असे सांगितल्यावर आंदोलकांनी आ.धस यांच्या भूमिकेचे स्वागत करत समाधान व्यक्त केलं.

## आडस प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील आडस येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला ग्रामीण रुग्णालयाचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी केज प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जावाढ करण्यासाठी पाठपुरावा केला होता. या निर्णयाने आडस प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत येणाऱ्या ग्रामीण भागात चांगली आरोग्यसेवा मिळणे शक्य होणार आहे. आडस ही केज तालुक्यातील महत्वाची बाजारपेठ असून उच्च दर्जाच्या शेळ्यांसाठी प्रसिद्ध आहे. आजूबाजूची वीस पेक्षाही अधिक खेडी या बाजारपेठेवर अवलंबून असल्याने येथे वर्दळ असते. त्यासोबतच येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज २०० ते ३०० रुग्ण उपचारासाठी येत असतात. आडस परिसरात लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे; मात्र त्या प्रमाणात तिथे नागरिकांना आरोग्याच्या सुविधा मिळत नव्हत्या. आजारी व अपघातग्रस्त व्यक्तींना अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात घेऊन जावे लागते. हे अंतर दूरवर असल्यामुळे अनेक रुग्णांनी वेळेत उपचार न मिळाल्याने प्राण गमावलेले आहेत. त्यामुळे या भागासाठी ग्रामीण रुग्णालयाची नितांत आवश्यकता होती. हि बाब लक्षात घेत आ. नमिता मुंदडा यांनी मागील चार वर्षापासून आडस प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी राज्य शासनाकडे करून त्यासाठी पाठपुरावा सुरु ठेवला होता. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून राज्य शासनाने आडस येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचा दर्जावाढ करण्याचा निर्णय घेतला असून लवकरच या ठिकाणी आता तीस खाटांचे ग्रामीण रुग्णालय होणार आहे. त्यामुळे आडस आणि आजूबाजूच्या ग्रामीण भागाला चांगली आरोग्यसेवा मिळणे शक्य होणार आहे. याबद्दल आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

## शेतकऱ्यांच्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी माजलगाव तहसीलवर धरणे आंदोलन

**माजलगाव । प्रतिनिधी**

शेतीमालाला हमीभाव मिळावा व इतर मागण्यांसाठी दिल्ली येथे संयुक्त किसान मोर्चाच्या वतीने शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू असून त्यास पाठिंबा देण्यासाठी तहसील येथे दि.१६ फेब्रुवारी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने आंदोलन करण्यात आले यावेळी तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले असून या निवेदनामध्ये शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव देण्याबाबत कायदा करण्यात यावा तसेच शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी योजना लागू करावी सामाजिक सुरक्षा उपाययोजना बळकट करून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात दलित आदिवासी यासारखे उपेक्षित समुदाय आणि महिला शेतकऱ्यांच्या जमिनीच्या हक्काचे संरक्षण करावे गायरान जमीन कसणाऱ्यांच्या नावे करावे संपत्ती आणि संसाधनाचे न्याय वितरण सुनिश्चित करण्यासाठी कार्पोरेट्स आणि श्रीमंतांवरील करांचे दर २०१८ पूर्वीप्रमाणे करावे यासह तालुक्यातील रेशनिंग समस्या वृद्धांच्या पेन्शन बाबतीत समस्या व मंजरथ ते माजलगाव ,सुरडी ते सावरगाव या रस्त्याचे काम जलद गतीने करण्यात यावे तसेच तेलगाव सुंदर सहकारी साखर कारखान्याने शेतकऱ्यांचे थकीत १४९ रुपयाचे बिल अदा करावे शालेय पोषण आहार कामगारांचे मानधनात वाढ करण्यात येऊन त्यांना संपूर्ण वर्षाचे मानधन देण्यात यावे यासारखे स्थानिक मागणी देखील करण्यात आले व तहसीलदार यांच्याशी चर्चा करण्यात आली हे आंदोलन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सचिव कॉम्रेड बाबा मुसद्दीक सर यांचे नेतृत्वाखाली करण्यात आले आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त भव्य आरोग्य शिबीर



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९४ व्या जयंती निमित्त दि.१८, १९ रोजी नवजीवन हॉस्पिटल इमर्जन्सी, ट्रॉमा अँन्ड क्रिटिकल केअर सेंटर माजलगाव आयोजित भव्य आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले असुन माजलगाव तालुक्यातील गरजु रुग्णांनी मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन नवजीवन हॉस्पिटल सर्वेसर्वा डॉ.शशांक कराळे यांनी केले आहे. या शिबिरामध्ये हृदयरोग,बीपी,शुगर, दमा,सांधेदुखी व ईतर सर्व आजार आजारा वरील निदान व उपचार हे डॉ.शशांक कराळे MBBS,DNB, (Emergency Medicine) Ex.Counsaltant, Medanta Hospital,Delhi हे दि.१८ व १९ करतील व रविवार दि.१८ फेब्रुवारी रोजी शिबिरामध्ये सहभागी होणारे तज्ञ डॉक्टर्स डॉ.गणेश सुरवसे MBBS,M.S (Ortho) Ex. Counsultant (-IIMS, Udaipur) अस्थिरोग तज्ञ हे फ्रॅक्चर वरील विविध आजार व उपचार कंबर मान गुडघेदुखी संधिवात मणक्या संबंधीचे विविध उपचार करतील व डॉ.स्वाती सुरवसे MBBS, M.S (Ophthal) नेत्र रोग तज्ञ डोळ्यासंबंधी सर्व आजार तपासणी व उपचार करतील या शिबिरामध्ये बी.पी, शुगर, इ.सी.जी उइउ चाचण्या मोफत करण्यात येणार आहेत व लिपिक प्रोफाइल थायरॉईड प्रोफाइल व इतर सर्व रक्त तपासणीवर ५०% सूट देण्यात येणार आहे तरी जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी या शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा असे आव्हान डॉ.शशांत कराळे यांनी केले आहे.

## २० फेब्रुवारीपासून सप्ताहाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

येथील बार्शी रोडवर असलेल्या श्रीसंत भगवान बाबा सामाजिक प्रतिष्ठानवर प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी सर्वधर्म समभाव राष्ट्रीय एकात्मताअखंड हरिनाम सप्ताहाचे मंगळवार दि. २० फेब्रुवारी २०२४ पासून आयोजन करण्यात आले आहे. सदर सप्ताहातील सकाळचे दैनिक कार्यक्रम संत भगवानबाबा भजनी मंडळामार्फत होणार आहेत. सायंकाळी ४.३० ते ५.३० प्रवचन, ५.३० ते ६.३० हरिपाठ, ६.३० ते ८.३० हरीकिर्तन व किर्तननंतर दरदिवशी महापंगत होणार करण्यात आहे. सप्ताहात प्रवचन व किर्तन पुढील प्रमाणे होणार आहेत. मंगळवार दिनांक २० फेब्रुवारी रोजी ह.भ.प. त्र्यंबक महाराज मातकर सर यांचे प्रवचन तर रात्री ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज शास्त्री, केज यांचे कीर्तन होणार आहे. बुधवार दि. २१ फेब्रुवारी राजेंद्र महाराज जोरे, अप्पर कोषागार अधिकारी बीड यांचे प्रवचन तर ह.भ.प. विष्णू महाराज पाळवदे सासोरा यांचे कीर्तन, गुरुवार दि. २२ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. बाबुराव मुंडे महाराज ताडसोन्ना यांचे प्रवचन, तर ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांचे कीर्तन, शुक्रवार दि. २३ फेब्रुवारी प्राचार्य परशुराम महाराज मराडे सर यांचे प्रवचन तर ह.भ.प.महादेव महाराज राऊत, कुटचिंतन प्रवक्ते म्हाळस जवळा यांचे कीर्तन होणार आहे. शनिवार दिनांक २४ फेब्रुवारी ह.भ.प. उषाताई मुंडे महाराज यांचे प्रवचन तर रामायणाचार्य ह.भ.प. एकनाथ महाराज गाडे यांचे कीर्तन. रविवार दि. २५ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. श्रीमंत महाराज तांदळे गुरुजी यांचे प्रवचन तर सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी ह.भ.प. पांडुरंग महाराज जाधव गुरुजी यांचे कीर्तन होणार आहे.

# परीक्षा केंद्रावर शांतता-सुव्यवस्था अबाधित राखा

**बीड । प्रतिनिधी**

सोलापूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट अ- ते गट-ड मधील ३०२ पदांची सरळसवेने भरण्याच्या अनुषंगाने टी.सी.एस. कंपनीमार्फत ऑनलाईन पध्दतीने महाराष्ट्रातील १८ जिल्हयामध्ये ४२ केंद्रावर दि. १५ ते १७ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत परीक्षा आयोजित करण्यात आली असून बीड जिल्हयात या कालावधीत तीन सत्रात खालीलप्रमाणे परीक्षा केद्रावर ऑनलाईन पध्दतीने परीक्ष घेण्यात येणार असल्याने परीक्षा केद्राच्या परिसरात १४४ प्रमाणे आदेश लागू केले आहे. परीक्षा केंद्राच्या परिसरात शांतता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जिल्हादंडाधिकारी दिपा मूधोळ-मुंढे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये परीक्षा केंद्राच्या २०० मीटर परिसरात दि. १५ फेब्रुवारी, २०२४ ते १७ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत परिक्षेच्या वेळेच्या १ तास आगोदर ते परीक्षा संपेपर्यंतच्या कालावधीत परीक्षा केद्राच्या परिसरात व परिक्षेचे साहित्य ठेवलेल्या ठिकाणी मनाई आदेश जारी केले आहे. परिक्षा शांततेच्या वातावरणात पार पाडण्यासाठी परिक्षा चालू असतांना परीक्ष न देणारे विद्याथी आणि इतर काही घटक परिक्षा केद्राच्या परिसरात परिक्षा चालू असतांना उपद्रव करित असतात. परिक्षा चालू असतांना कॉपी देण्याचा प्रयत्न करतात तसेच परिसरातील झेराक्स सेंटरचा कॉपी पुरविण्यासाठी दूरूपयोग होण्याची शक्यता लक्षात घेता परिक्षा देणा-य विद्यार्थ्यांना व परिक्षेसाठी नियुक्त अधिकारी ,कर्मचारी यांना बाहेरील व्यक्तींचा त्रास होऊ नये इयत्ता १२ व दहावीच्या परिक्षा केंद्राच्या ठिकाणी व परिक्षा केंद्राच्या २०० मिटर परिसरात फौज्दारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) करण्यात आले आहे. या परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम जारी केला असून परीक्षा केंद्राच्या परिसरात १०० मीटर अंतरापर्यंत शासकीय कर्तव्ये पार पाडणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, परीक्षार्थी यांच्या व्यवतिरिक्त दोन किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्ती एकत्र येण्यास, फोटोकॉपी, ई-मेल, इंटरनेट सुविधा, इतर दळणवळण, संदेश वहन साधने तसेच कोणत्याही व्यक्तीजवळ मोबाईल, वायरलेस सेट, कॅल्क्युलेटर, लॅपटॉप, संगणक बाळगण्यास, एस.टी.डी,आय.एस.डी मशिन, ध्वनीक्षेपक वाजविण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. शासकीय परिक्षेसंबधीत कर्मचाऱ्यांच्या व विद्यार्थ्यांच्या वाहना व्यतिरीक्त इतर अनाधिकृत वाहनांना परिक्षा केंद्राच्या २०० मिटर परिसरात येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश कोणत्याही धार्मिक कार्यक्रम, मयताची अंत्ययात्रासाठी लागु राहणार नाही.

## संपृक्तता साध्यतेसाठी गाव पातळीवरील विशेष मोहीम

**बीड । प्रतिनिधी**

शेतक-यांना निश्चित उत्पन्न मिळवून देणाऱ्या केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सम्मान निधी योजनेची संपृक्तता साध्यतेसाठी राज्यात दिनांक ६ डिसेंबर, २०२३ ते १५ जानेवारी, २०२४ या कालावधीत राबविलेल्या मोहिमेत १.०४ लाख शेतकऱ्यांचे ई-केवायसी प्रमाणिकरण.३.०१ लाख स्वयंनोंदणीकृत शेतकऱ्यांची नव्याने नोंदणी करण्यात आली. तथापि, राज्यातील एकूण १.९४ लाख शेतकऱ्यांनी योजनेच्या लाभासाठी आवश्यक इतर सर्व बाबींची पूर्तता केलेली असून त्यांचे केवळ ई-केवायसी करणे बाकी आहे. अशा शेतक-यांचे मुख्यतः सामाईक सुविधा केंद्रांमार्फत ए-घधउ प्रमाणिकरण करण्यासाठी दि. १२ फेब्रुवारी ते दि. २१ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत १० दिवसांची देशव्यापी संपृक्तता मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेची क्षेत्रीयस्तरावर प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कृषीचे आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांनी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना निर्देश दिले आहेत. या मोहिमे दरम्यान केवळ ई के वाय सी प्रमाणिकरण बाकी असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या नजिकचे सामाईक सुविधा केंद्र व ग्रामस्तरीय नोडल अधिकारी यांचे मार्फत एघधउ प्रमाणिकरण पूर्ण फरावे.शेतक-यांनी स्वतःचे ई-केवायसी प्रणाणिकरण करण्यासाठी मोबाईलवरील ओटीपी, सामाईक सुविधा केंद्र. पी. एम. किसान फेस ऑर्थेटिकेशन ॲप या सुविधांपैकी कोणत्याही एका सुविधेचा वापर करावा. पी. एम. किसान योजने अंतर्गत ई-केवायसी प्रमाणिकर करणे, योजनेसाठी नव्याने नोंदणी करणे,बँक खाती आधार क्रमांकास जोडणे या बाबींची पूर्तता करण्यासाठी शेतकऱ्यांनी समक्ष हजर असणे आवश्यक आहे.बँक खाती आधार संलग्न करणे बाकी असलेल्या शेतक-यांनी आपल्या सोईनुसार प्राधान्याने नजीकचे पोस्ट कार्यालयामध्ये आधार संलग्न खाते उघडावे.केंद्र शासन पी. एम. किसान योजनेचा १६ वा हप्ता माहे फेब्रुवारी, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वितरीत करणार आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com